MHRG110005302021

**रे. मु. नं. ५४/२०२१ मधील निशाणी क्र. २६ वरील आदेश**
**(पारीत दिनांक ११.०३.२०२५)**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश १ नियम १० अन्वये प्रतिवादी क्र. ९ मनोजकुमार चंपापलाल, प्रतिवादी क्र. १० एम. संजयकुमार जैन, प्रतिवादी क्र. ११ डॉली प्रकाशचंद जैन यांना प्रस्तुत अर्जामध्ये पक्षकार म्हणुन समाविष्ट करण्यासाठी सादर केला आहे.

२. अर्जामध्ये नमुद आहे की, वादी यांनी प्रतिवादींविरुध्द कराराची पूर्तता करुन मिळण्याकरिता सदरचा दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्याकामी प्रतिवादींना समन्सची बजावणी होवुनही प्रतिवादी उपस्थित न राहिल्यामुळे प्रतिवादींविरुध्द विनाकैफियतीचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. प्रतिवादींनी दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी प्रतिवादी क्र. ९ ते ११ यांना दिनांक १५.०३.२०२२ रोजी दस्त क्र. ७३६/२०२२ या दस्ताच्या आधारे दावा मिळकतीची विक्री केलेली आहे.

३. दाव्याकामी प्रतिवादी क्र. ९ ते ११ यांना पक्षकार म्हणून सामील करणे आवश्यक आहे. तरी दाव्याकामी सरनाम्यात प्रतिवादींचे अनुक्रमांकमध्ये दुरुस्ती करुन प्रतिवादी क्र. १ ते ८ असून नमूद करुन त्यापुढे दावा मिळकतीचे नवीन खरेदीदार यांना पक्षकार म्हणून सामील करण्यात यावे अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांचे म्हणणे सादर केले व नमुद केले की, प्रतिवादी क्र. ९ ते ११ यांना पक्षकार म्हणून समाविष्ट करण्यासाठी त्यांना हरकत नाही. प्रतिवादी क्र. २ हे मयत आहेत. प्रतिवादी क्र. ३ ते ८ यांनी हजर होवुन त्यांनी कैफियत व म्हणणे सादर केले नसल्यामुळे त्यांच्या विरुध्द दिनांक ०९.०३.२०२२ रोजी निशाणी क्र. १ वर आदेश पारीत करण्यात आला व प्रकरण विनाकैफियत चालविण्यात आले आहे. प्रतिवादी क्र. ३ ते ८ यांनी त्यांचे म्हणणे सादर केले नाही. म्हणून त्यांच्या म्हणण्याविना अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

५. अभिलेखावरील खरेदी दस्ताच्या प्रमाणित प्रतीची पाहणी केली असता असे दिसुन येते की, अभिलेखावरील खरेदीखत दस्त क्र. ७३६/२२ प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी डॉली प्रकाशचंद जैन यांच्या लाभामध्ये दावा मिळकतीचे खरेदी दस्त करुन दिलेले आहे. तसेच खरेदी दस्त २७१४/२२ च्या दस्ताची पाहणी केली असता दिसुन येते की, सदरचे खरेदी दस्त डॉली प्रकाशचंद जैन यांनी मनोजकुमार चंपापलाल यांच्या लाभामध्ये दावा मिळकत क्षेत्रफळ ०–६५–०० हे.आर. च्या क्षेत्रफळापैकी ०–४५–०० हे.आर. च्या क्षेत्राकरिता खरेदी दस्त करुन दिलेले आहे. तसेच खरेदी दस्त क्र. २८०३/२२ च्या दस्ताची पाहणी केली असता दिसुन येते की, सदर दस्त डॉली प्रकाशचंद जैन यांनी एम. संजयकुमार जैन यांच्या लाभामध्ये दावा मिळकत क्षेत्रफळ ०–६५–०० हे.आर. च्या क्षेत्रफळापैकी ०–२०–०० हे.आर. च्या क्षेत्राकरिता खरेदी दस्त करुन दिलेले आहे.

६. अभिलेखावरील खरेदीखत दस्त क्र. ७३६/२२, खरेदी दस्त २७१४/२२ व खरेदी दस्त क्र. २८०३/२२ वरुन स्पष्ट होते की, दावा मिळकतीबाबतचे खरेदी दस्त

डॉली प्रकाशचंद जैन, मनोजकुमार चंपापलाल व एम. संजयकुमार जैन यांच्या नावे आहे. प्रस्तुतचा दावा हा विशिष्ट कराराच्या पूर्ततेकरिता व निरंतर ताकिदीच्या हुकूमाच्या आदेशाकरिता दाखल केलेला आहे. अशा परिस्थितीमध्ये सदर डॉली प्रकाशचंद जैन, मनोजकुमार चंपापलाल व एम. संजयकुमार जैन यांना दाव्यामध्ये पक्षकार म्हणुन समाविष्ट केल्यानंतर दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. तसेच, दावा निकाली काढण्यासाठी डॉली प्रकाशचंद जैन, मनोजकुमार चंपापलाल व एम. संजयकुमार जैन हे महत्वाचे व आवश्यक पक्षकार असल्याचे दिसुन येते. तसेच, प्रक्रियेची बाहुल्यता टाळण्यासाठी देखील त्यांना पक्षकार म्हणुन समाविष्ट करणे महत्वाचे आहे. म्हणुन डॉली प्रकाशचंद जैन, मनोजकुमार चंपापलाल व एम. संजयकुमार जैन यांना प्रतिवादी म्हणून समाविष्ट करणे आवश्यक आहे. म्हणून सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणुन, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. निशाणी क्र. २६ वरील अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. डॉली प्रकाशचंद जैन, मनोजकुमार चंपापलाल व एम. संजयकुमार जैन यांना प्रतिवादी म्हणुन समाविष्ट करण्यात यावे.

३. वादी यांनी पुढील तारखेपर्यंत दुरुस्ती करुन दुरुस्ती प्रत सादर करावी.

GAJANAN CHANDRAKANT FULZALKE

Digitally signed by GAJANAN CHANDRAKANT FULZALKE
Date: 2025.03.11 18:02:06 +0530

माणगांव, (जी. सी. फुलझळके)

दिनांक – ११.०३.२०२५ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, माणगांव